# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वय दाखल झालेल्या तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम-०३/२०२०**

**तक्रारकर्ता श्रीमती मंगला डी. अहेर**
१००१, मनिषा अॅनेक्स, १० वा मजला, टाटा कॉलनीजवळ,
६० फुट रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०००८१.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) पू.उ.**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) पूर्व उपनगर यांचे कार्यालय पेपर मिल कंपाउंड,
राज लेगसी जवळ, ला.ब.शास्त्री मार्ग,विक्रोळी (प.), मुंबई ४०००८३.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.) पू.उ.**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (इ.प्र.) पूर्व उपनगर यांचे कार्यालय ...
राज लेगसी जवळ, ला.ब.शास्त्री मार्ग,विक्रोळी (प.), मुंबई ४०...

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २७.०१.२०२०**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र.मुमाआ.नों.क्र.४११७/२०१८ रा.मा.आ. अपील ... दि. २०.१२.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत.

" अपिलार्थी यांची विनंती मान्य करुन द्वितीय अपील अर्ज तक्रार अर्ज ... करण्यात येत आहे. सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी या तक्रार अर्जावर ... अपिलार्थी यांना वेळ देण्यामध्ये कोणताही आक्षेप नाही. या प्रकरणावर पुन्हा सुनावणी ...

आदेश

१) अपिलार्थी यांना दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज कलम १८ अन्वये तक्रार ... आहेत.
२) सदर प्रकरण पुढील सुनावणी दि.२७.०१.२०२० रोजी दुपारी ०३... "

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. ... आला असून सदर तक्रार अर्जावर आज दि. २७.०१.२०२० रोजी सुनावणी आयोजित ...

सदर सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना नस्तीचा अभ्यास ... मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०३.२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजता ...**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त ...

**मुंबई**
**दिनांक : २८.०१.२०२०**

07 FEB 2020

रा.मा.आ. तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०

तक्रारकर्ता श्रीमती मंगला डी. अहेर

सुनावणी दिनांक : ०५.०३.२०२० (In continuation of order dtd २८.०१.२०२०)

[illegible] कोणताही आदेश पारित करण्याअगोदर दि. ०२.०३.२०२० रोजी जन माहिती अधिकारी [illegible] अधिकारी (इ.प्र.) यांनी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी [illegible] पत्राच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेली माहितीसह संबंधीत जन माहिती अधिकारी तथा [illegible] अग्निशमन अधिकारी, विक्रोळी यांची उपस्थिती आवश्यक आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी [illegible] कलम १८(३)(a) अंतर्गत माहितीसह उपस्थिती राहावे. या प्रकरणावर पुन्हा सुनावणी [illegible]

[illegible] अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी यांच्या उपस्थितीबाबत [illegible] जन [illegible] अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) यांनी कळवावे.

आदेश

सदर प्रकरणी पुढील सुनावणी ३१.०३.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात यईल.

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक ०५.०३.२०२०

**रा.मा.आ. तक्रार क्र. बीएम ०३/२०२०**

**तक्रारकर्ता- श्रीमती मंगला डी. अहेर**

**ुनावणी दिनांक : ३०.०३.२०२१ (In continuation of order dt ०५.०३.२०२१)**

दिनांक ०५.०३.२०२१ रोजी आयोगाने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत ारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. आजच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र ्नांक २५.०३.२०२१ आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले आहे की, या प्रकरणामध्ये वर्ष २०१३ ाध्ये महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याचा ाहवाल अभिलेखावर घेण्यात आला.

या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित संचिकेचे पुनर्गठणाबाबत आदेश दिले होते. ा आदेशाला द्वितीय अपील अर्जामध्ये आव्हानीत करण्यात आलेले नव्हते. या कारणामुळे अपिलार्थी यांचो विनंतीवर द्वितीय अपील अर्ज कलम १८ अंतर्गत तक्रारीमध्ये रुपांतरीत करण्यात आली होती व संबंधित तक्रारीची सुनावणी आयोगासमोर चालू आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधित धारिकेचे पुनर्गठण करण्याबाबत आदेशित केले होते. संबंधित धारिकेचे पुनर्गठणासाठी प्रथम अपिल आदेशानंतर क यात आलेल्या कार्यवाहीची सविस्तर माहिती खालील मुद्दयांवर आयोगासमोर सादर करावी.

१. कोणत्याही इमारत प्रस्तावाला मान्यता देतेवेळी ज्या विभागाकडून पत्रव्यवहार करण्यात येत आहे किंवा ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होत आहे, त्याची यादी व त्या यादीनुसार या प्रकरणामध्ये संबंधित विभागाकडून धारिकेचे पुनर्गठण करणेसंबंधी करण्यात आलेले पत्रव्यवहार व त्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती. संबंधित विभागाकडून परिपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे किंवा नाही, या बाबतचे इमारत प्रस्ताव विभागाचे अभिप्राय.

२. संबंधित विकासक/आर्किटेक्ट यांचेकडून संचिकेच्या पुर्नगठणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यानुसार माहिती प्राप्त करण्याबाबतची तरतूद व त्या अनुषंगाने करण्यात आलेली कारवाई.

३. इमारत प्रस्ताव मान्यतेसाठी संचिका ज्या ज्या टप्प्याला सादर करण्यात येत आहे उदा. मुख्य अभियंता, डी.पी व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालयात इमारत प्रस्तावसंबंधी नस्ती प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत ठेवण्यासंबंधी काही पध्दत /दिशानिर्देश आहेत का, असेल तर त्याप्रमाणे या नस्तीचे टिप्पणी ची प्रत त्या त्या कार्यालयात उपलब्ध आहे का. या संबंधीची माहिती.

४. या प्रकरणावर पुढील सुनावणी [illegible] २०२१ रोजी दुपारी ०४.०० वाजता घेण्यात येईल.

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०१.०४.२०२१

**रा.मा.आ. तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०**

**तक्रारकर्ता श्रीमती. मंगला डी. अहेर**

**सुनावणी दिनांक : १५.०६.२०२१ (In continuation of order dt ०१.०४.२०२१)**

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) यांनी दि. ०१.०४.२०२१ च्या आदेशास अनुसरुन त्यांचा लेखी अहवाल ७ दिवसांत आयोगासमोर सादर करावा व त्याची एक प्रत नोंदणीकृत टपालाने अपिलार्थींना पाठवावी.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी या आयोगाचे आदेश दि. ०५.०३.२०२० निदर्शनास आणून सादर केले की, जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी यांना प्रतिबंधित क्षेत्र (Refuse Area) संबंधी नवीन नियम सादर करावयाचे होते. तथापि, ते सादर झालेले नाही. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी यांनी प्रतिबंधित क्षेत्र (Refuse Area) नियमासह सुनावणीच्या वेळी उपस्थित राहावे व त्याची एक प्रत अपिलार्थींना पाठवावी.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९.०७.२०२१ रोजी दुपारी [illegible] वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : १६.०६.२०२१**

(सुनील पाटील)
राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र

**प्रत:- उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी.**

**(जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.) यांनी सदर आदेशाची प्रत उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी यांना द्यावी.)**

ISSUED
24 JUN 2021

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०
## तक्रारकर्ता श्रीम. मंगला डी. अहेर
## सुनावणी दिनांक : ०२.१२.२०२१ (In continuation of order dt १६.०६.२०२१)

आजच्या सुनावणीसाठी श्री. दिपक घोष, उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी उपस्थित असून त्यांनी असे नमूद केले की, या प्रकरणी दिलेल्या NOC मध्ये नमूद नवीन नियमाचा अर्थ सन-१९९१ चे DCR आहे. सन-१९९१ चे DCR संकेतस्थळावर उपलब्ध आहे असे श्री. दिपक घोष व अपीलार्थी यांनी सादर केले.

या प्रकरणी संबंधित इमारतीला ज्या धारीकेद्वारे मान्यता देण्यात आली होती ती धारीका गहाळ झाली आहे. याबाबतची तक्रार संबंधित पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. संबंधित तक्रारावर पुढे कोणती कारवाई झाली नाही असे या आयोगाचे निदर्शनास आले आहे. या कारणामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी संबंधित तक्रार अर्जावर झालेली कारवाई बाबतची माहिती संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त करुन या आयोगासमारे सादर करावी.

आजच्या सुनावणीच्या वेळी श्री. घोष, उप प्रमुख अग्निशमन अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सादर केले की, या प्रकरणी Fire Department द्वारे जी मान्यता देण्यात आली आहे त्या धारीकेचे निरीक्षण अपीलार्थींना देता येईल. एक वेळ निश्चित करुन संबंधित धारीकेचे निरीक्षण अपीलार्थींना देण्यात यावे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०५.०१.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०३.१२.२०२१

निर्गमित
दिनांक: 9 DEC 2021
स्वाक्षरी:

**रामाआ-तक्रार क्र. बीएम-०३/२०२०**

**तक्रारकर्ता श्रीमती मंगला डी. अहेर**

**सुनावणी दिनांक : ०४.०४.२०२२ (In continuation of order dt ०३.१२.२०२१)**

या प्रकरणी आज दिनांक ०४.०४.२०२० रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. अपिलार्थी सुनावणीस उपस्थित आहेत. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सुनावणीसाठी बोलविण्यात आलेले सर्व अधिकारी अनुपस्थित आहेत.

दिनांक ०२.१२.२०२१ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे दाखल करण्यात आलेल्या पोलीस तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०३.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अहवाल सादर केला आहे. या अहवालावरुन असे दिसते की, पोलीस विभागाद्वारे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. वर्ष २०१३ च्या तक्रार अर्जाचे कागदपत्रंही उपलब्ध नाहीत. या कारणामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी पुन्हा तक्रार नोंदविण्याची कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाला आयोगासमोर १५ दिवसात सादर करावा.

आयोगाने दिनांक ०२.१२.२०२१ रोजी अग्नीशमन विभागाद्वारे नस्तीचे निरीक्षण करण्यासाठीही आदेशीत केले होते. अपिलार्थी यांना निरीक्षण प्राप्त झाले आहे व उपलब्ध कागदपत्रंही प्राप्त झाले आहेत. तथापि ना हरकत प्रमाणपत्र (NOC) निर्गमित करतेवेळी कार्यालयात करण्यात आलेल्या टिप्पणीची प्रत मिळालेली नाही. या कारणामुळे या प्रकरणासंबंधीचे अग्नीशमक विभागात उपलब्ध सर्व कागदपत्रं आयोगासमोर सादर करावेत.

या प्रकरणावर पुढील सुनावणी दि. ०६ जून, २०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल. कार्यालयाने अग्नीशमक दल, प्रशासकीय अधिकारी इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका व जन माहिती अधिकारी इमारत व कारखाने विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना सुनावणीची नोटीस काढावी.

State Information Commission Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०५.०४.२०२२

निर्गमित
11 APR 2022
ति:

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०
## तक्रारकर्ता श्रीमती मंगला डी. अहेर

**सुनावणी दिनांक : ०६.०६.२०२२ (In continuation of order dt ०५.०४.२०२२)**

या प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकाव्दारे दि. १९.०४.२०२२ रोजी वरिष्ठ पोलीस उप निरीक्षक, पंतनगर पोलीस ठाणे, घाटकोपर यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केली आहे. या तक्रार अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इमारत प्रस्ताव) पूर्व उपनगरे यांनी अपिलार्थींना उपलब्ध करुन द्यावी.

सुनावणीच्या वेळी अग्निशमन दलाचे संबंधीत अधिकारी श्री. दिपक घोष, उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी उपस्थित असून त्यांनी असे सादर केले की, या प्रकरणसंबंधीत त्यांच्याकडे उपलब्ध सर्व कागदपत्रांचे निरीक्षण अपिलार्थींना देण्यात आले आहे. त्याच्या व्यतिरिक्त यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. जन माहिती अधिकारी, अग्निशमक दल यांनी त्यांच्याकडे उपलब्ध कागदपत्रांची यादी अपिलार्थींना उपलब्ध करुन द्यावी व त्यांच्याकडे या प्रकरणी इतर कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाही यासंबंधी सुस्पष्ट उत्तर अपिलार्थींना द्यावे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी विशेष परिस्थितीमध्ये सवलत मान्यता (concession approval) घेण्यासाठी मा. आयुक्त कार्यालयाव्दारे निर्गमित करण्यात आलेले पत्राची मागणी केली आहे. यावर श्री. पाटील, सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव यांनी असे सादर केले की, सवलत मान्यता (concession approval) घेण्यासाठी कोणतेही वेगळे पत्र निर्गमित करण्याची पध्दत नाही. संबंधीत धारीका मा. आयुक्त यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे यासाठी मा. आयुक्त कार्यालयाकडून कोणतेही वेगळे पत्र निर्गमित करण्याची पध्दत नाही.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र.), पू.उ., बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.), पू.उ., बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिलेले आदेशाच्या अंमलबजावणीसाठी केलेली कारवाई यासंबंधीची संक्षिप्त टिप्पणी आयोगासमोर ३० दिवसांत सादर करावी.

### आदेश

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.०८.२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल.**

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : ०७.०६.२०२२

निर्गमित
10 JUN 2022

प्रत: (१) जन माहिती अधिकारी तथा उप प्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी, मुंबई- ८३.
(२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.), बृ.म.पा. मुलुंड, मुंबई- ८१.

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०**
**अपिलार्थी श्रीमती. मंगला डी. अहेर**
**सुनावणी दिनांक : २६.०४.२०२३**

या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७.०६.२०१८ रोजी नस्तीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आदेश पारीत केले होते. त्या आदेशास अनुसरुन झालेल्या कार्यवाहीबाबतचे प्रतिज्ञापत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर करावे.

प्रतिज्ञापत्रामध्ये सदर नस्तीचे पुनरुज्जीवन करतेवेळी सर्व कागदपत्रं नस्तीमध्ये उपलब्ध झालेले आहेत या संबंधीचे प्रमाणपत्र व जी कागदपत्रं उपलब्ध करणे शक्य नसेल (यादीसह), त्या संबंधीचे प्रमाणपत्रही सादर करावे.

या प्रकरणी इमारत प्रस्ताव विभागाची एक नस्ती गहाळ झालेली आहे. नस्ती गहाळ झाल्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे विभागाने ४५ दिवसात चौकशी पूर्ण करावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपिलार्थी यांना द्यावी.

या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक २४ मे, २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल.

मुंबई
दिनांक : २७.०४.२०२३

सुनील पोरवाल
**(सुनील पोरवाल)**
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

State Information Commission Greater Mumbai

निर्गमित
दिनांक 0 2 MAY 2023
स्वाक्षरी

## तक्रार क्र. ०३/२०२०
## अपिलार्थी श्रीमती मंगला डी अहेर
## सुनावणी दिनांक : २४.०५.२०२३ (In continuation of order dt २७.०४.२०२३ )

या प्रकरणी आयोगाने दिनांक २६.०४.२०२३ रोजी खालीलप्रामणे आदेश दिले होते:

"या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७.०६.२०१८ रोजी नस्तीचे पुनरुज्जीवन करण्यासाठी आदेश पारीत केले होते. त्या आदेशास अनुसरुन झालेल्या कार्यवाहीबाबतचे प्रतिज्ञापत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर करावे.

प्रतिज्ञापत्रामध्ये सदर नस्तीचे पुनरुज्जीवन करतेवेळी सर्व कागदपत्रं नस्तीमध्ये उपलब्ध झालेले आहेत या संबंधीचे प्रमाणपत्र व जी कागदपत्रं उपलब्ध करणे शक्य नसेल (यादीसह), त्या संबंधीचे प्रमाणपत्रही सादर करावे.

या प्रकरणी इमारत प्रस्ताव विभागाची एक नस्ती गहाळ झालेली आहे. नस्ती गहाळ झाल्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे विभागाने ४५ दिवसात चौकशी पूर्ण करावी व त्याचा अहवाल आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपिलार्थी यांना द्यावी.

या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक २४ मे, २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल

आजचे सुनावणीस उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे उक्त आदेशानुसार पुनरुज्जीवित केलेली नस्ती आयोगासमोर सादर केली.

नस्तीचे पुनरुज्जीवन करतेवेळी विभागाच्या नियमाप्रमाणे नस्तीवर क्रमांक देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे त्याची इंडेक्सींग करणे आवश्यक आहे व ज्या ज्या स्त्रोतातून पुनरुज्जीवनसाठी माहिती प्राप्त होऊ शकेल तेही करणे आवश्यक आहे. पुनरुज्जीवित झालेल्या नस्तीचे वेळोवेळी अपिलार्थी यांना निरीक्षण देण्यात यावे व त्याची प्रतही उपलब्ध करुन देण्यात यावी.

मूळ नस्ती गहाळ झाल्याबाबबत चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे व चौकशीची कारवाई पूर्ण करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेद्वारे वेळेची मागणी करण्यात आलेली आहे. त्यांची मागणी मान्य करुन या प्रकरणी पुढील सुनावणी १७ ऑगष्ट २०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजता घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

मुंबई
दिनांक : २५.०५.२०२३

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०**
**तक्रारकर्ता श्रीमती. मंगला डी. अहेर**
**सुनावणी दिनांक : १७.०८.२०२३ (In continuation of order dt २५.०५.२०२३)**

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, चौकशीची कारवाई पूर्ण झालेली आहे व अहवाल प्रमुख अभियंता, विकास नियोजन यांच्याकडे सादर करण्यात आली आहे त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त नाही. या कारणामुळे त्यांनी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०३.१०.२०२३ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

मुंबई
दिनांक : १७.०८.२०२३

State Information Commission Greater Mumbai

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**अपील क्र. ०३/२०२०**

**तक्रारकर्ता श्रीमती. मंगला अहेर**

**सुनावणी दिनांक : ०३.१०.२०२३ (In continuation of order dt. 17.08.2023)**

या प्रकरणी आयोगाने दिनांक १७.०८.२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारीत केले होते:

"सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, चौकशीची कारवाई पूर्ण झालेली आहे व अहवाल प्रमुख अभियंता, विकास नियोजन यांच्याकडे सादर करण्यात आली आहे त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त नाही. या कारणामुळे त्यांनी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे."

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित आहेत तथापि, त्यांनी खालीलप्रमाणे विनंती केली आहे:

The undersigned. Mrs. Mangala Daulat Aher received letter from Rajya Mahi Aayog Mumbai dated August 17th, 2023 via speed post. The letter has reference number RaMaa-Takrar Kramank BM-03/2020

The letter is regarding the RTI hearing that is scheduled on October 3rd, 2023 at 2:00 PM Land like to request you that due to some unavoidable circumstances I am out of my hometown and in a different state, and due to this, I will be unable to attend the hearing scheduled on October 3rd, 2023, at 2 PM.

I would like to cordially request you to please reschedule this hearing in the month of December 2023 if possible, as I am out of my hometown for some critical reasons

I am Sorry for the inconvenience caused.

अपिलार्थींची विनंती मान्य करुन आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**या प्रकरणावर पुढील सुनावणी नंतर घेण्यात येईल. सुनावणीचा दिनांक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

**मुंबई**
**दिनांक : ०४.१०.२०२३**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०
## तक्रारकता श्रीम. मंगला अहेर

**सुनावणी दिनांक : १६.०४.२०२५ (In continuation of order dt ०४.१०.२०२३)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी दि. १७.०८.२०२३ रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, चौकशीची कारवाई पूर्ण झालेली आहे व अहवाल प्रमुख अभियंता, विकास नियोजन यांच्याकडे सादर करण्यात आली आहे त्याची प्रत जन माहिती अधिकारी यांना प्राप्त नाही. या कारणामुळे त्यांनी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात आली. तसेच, दि. ०३.१०.२०२३ रोजी तक्रारकर्ता यांनी सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी, श्रीम. श्रुती नार्वेकर, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई, श्री. विनोद मयेकर, जन माहिती अधिकारी, वि.अ.अ. मुंबई आग्निशमन दल, विक्रोळी समादेश केंद्र, विक्रोळी, मुंबई तसेच, श्री. आत्माराम मिश्रा, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख आग्निशमन अधिकारी, विक्रोळी समादेश केंद्र, विक्रोळी, मुंबई उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी मान्य केले की, पुर्नजिवीत करण्यात आलेली नस्ती दाखविण्यात आली आहे व त्यांनी ती नस्ती प्राप्त केलेली आहे. त्यांना आग्निशमन विभागामार्फत देण्यात आलेले ना- हरकत प्रमाणपत्र तसेच अंतीम ना- हरकत प्रमाणपत्राची प्रत प्राप्त झालेली आहे. परंतु, त्यांना आग्निशमन विभागाकडून देण्यात आलेल्या स्वीकृती पत्राची (Approval letter) प्रत प्राप्त झालेली नाही.

आग्निशमन विभागाचे उपस्थित अधिकारी यांनी असे सादर केले की, त्यांचे कार्यालयाने दिलेले ना- हरकत प्रमाणपत्रावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी पुढील कार्यवाही करतात.

तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी असे सादर केले की, त्यांना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव यांच्याकडून Discretionery Approval Letter ची प्रत अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई याविषयी काही सांगू शकले नाही व त्यांनी याबाबत माहिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली.

तक्रारकर्ता यांनी मुद्दा उपस्थित केला की, सदर इमारतीत प्रतिबंधित क्षेत्र (Refuse Area) ७ व्या माळावर आहे व त्यांना प्रतिबंधित क्षेत्र (Refuse Area) दाखविण्यात आलेली नकाशाची प्रत हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना नकाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. जेथे की, प्रतिबंधित क्षेत्र (Refuse Area) १० व्या माळ्यावर दाखविण्यात आला आहे.

..२/-

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई यांना दि. १७.०८.२०२३ च्या आदेशाविषयी आयोगाने विचारणा केली. त्याबाबत जन माहिती अधिकारी काही सादर करु शकले नाही. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाचे आदेश दि. १७.०८.२०२३ च्या अनुषंगाने व Discretionery Approval Letter विषयी माहिती घेऊन उपस्थित रहावे.

तक्रारकर्ता यांनी Development Regulation विषयी आयोगासमोर काही मुद्दे उपस्थित केले. जे की, माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाहीत.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १५.०५.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 21-4-2025

**मुंबई**
**दिनांक : २१.०४.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

निर्गमित
दिनांक 24 APR 2025

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ०३/२०२०
## तक्रारकर्ता श्रीमती मंगला अहेर

**सुनावणी दिनांक : १५.०५.२०२५ (In continuation of order dt २१.०४.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई यांना दि. १७.०८.२०२३ च्या आदेशाविषयी आयोगाने विचारणा केली. त्याबाबत जन माहिती अधिकारी काही सादर करु शकले नाही. त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाचे आदेश दि. १७.०८.२०२३ च्या अनुषंगाने व Discretionery Approval Letter विषयी माहिती घेऊन उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी, श्रीम. श्रुती नार्वेकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई व श्री. आत्माराम मिश्रा, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख आग्निशमन अधिकारी, विक्रोळी समादेश केंद्र, विक्रोळी, मुंबई उपस्थित असून श्रीम. श्रुती नार्वेकर, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई यांनी असे सादर केले की, त्यांनी यापूर्वी आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने धारीका क्र. CE/४३०४/BPES/AT ही पुनर्जीवित केलेली आहे. त्या पुनर्जीवित धारिकेत कोणकोणते कागदपत्रे उपलब्ध आहेत व कोणकोणते उपलब्ध नाहीत, याविषयी प्रमाणपत्र दिलेले आहे आणि जे कागदपत्रे उपलब्ध नाही त्या प्रमाणपत्रातील अनुक्रमांक- १४ येथे नमुद concession file उपलब्ध नाही. म्हणून Discretionery Approval Letter विषयी काही माहिती देऊ शकत नाहीत.

तक्रारकर्ता यांचे प्रतिनिधी यांनी FBM/S/५०२/९० दि. १६.०८.२००२ रोजीचे अग्निशमन विभागाचे ना- हरकत प्रमाणपत्राचे परिच्छेद- ३ मध्ये "The refuse area is proposed on tenth floor as per new rules and guidlines" आयोगाचे निदर्शनास आणून 'New Rules and guidlines' विषयी माहिती मिळण्याची विनंती केली.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख आग्निशमन अधिकारी, विक्रोळी समादेश केंद्र, विक्रोळी, मुंबई यांनी १४.०६.२०२२ रोजीचे पत्र आयोगासमोर सादर करुन निदर्शनास आणले. जेथे की, तक्रारकर्ता यांना कळविले होते की, त्यांच्याकडे उपलब्ध धारिकेत कोणकोणते कागदपत्रे उपलब्ध आहे व सर्व उपलब्ध कागदपत्रांच्या साक्षांकित/ छायांकित प्रती दि. १५.१२.२०२१ रोजी देण्यात आल्या आहेत व या व्यतिरिक्त धारिकेत इतर कोणतेही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. सदर पत्र तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत प्रस्ताव, पूर्व उपनगरे, विक्रोळी, मुंबई तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रमुख आग्निशमन अधिकारी, विक्रोळी समादेश केंद्र, विक्रोळी, मुंबई यांनी तक्रारकर्ता यांना उपलब्ध अभिलेखावरुन माहिती देण्यात आलेली आहे.

..२/-

या संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २०.०५.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

प्रत: जन माहिती अधिकारी तथा उपप्रमुख अग्निशमन अधिकारी, विक्रोळी, मुंबई.